क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/


**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.


**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.२२२ दिनांक १३/०४/२००९

विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूका - २००९
- निवडणूक कालावधीत शासकीय वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.सीईएल-२००९/प्र.क्र.१९७/२००९/३३, मंत्रालय, मुंबई दिनांक ०३.०३.२००९.

.....

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्या संदर्भिय शासन परिपत्रकान्वये निवडणुकीच्या कालावधीमध्ये निवडणुकीच्या प्रचारार्थ, निवडणुकीच्या कार्यासाठी अथवा निवडणुकीच्या प्रवासाकरिता मंत्री, राज्यमंत्री, राजकीय पक्ष, उमेदवार वा निवडणुकीशी संबंधीत अन्य कोणत्याही व्यक्तीने शासकीय वाहनांचा वापर करण्यावर संपूर्ण बंदी घातली आहे. सदर दिनांक ०३.०३.२००९ च्या शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

२. या संदर्भात भारत निवडणूक आयोगाने या विषयाबाबत क्र.४३७/६/९६ (पीएलएन-तीन) २४११ दिनांक १५.०१.१९९६ अन्वये जारी केलेल्या आदेशाची प्रतही माहितीस्तव सोबत जोडली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १५.०१.१९९६ च्या आदेशानुसार कंपनीच्या मालकीच्या वाहनांचा निवडणूक जाहीर झाल्याच्या तारखेपासून ते निवडणूक पूर्ण होण्याच्या तारखेपर्यंत मंत्री यांच्यासह अन्य कोणाही अधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेल्या शासकीय वाहनांचा वापर निवडणूक प्रचारार्थ वा निवडणुकीशी संबंधित दौऱ्यावर करण्याकरिता जरी भरणा तत्त्वावर (on Payment Basis) करावयाचा झाला तरी, पूर्णत: बंदी घालण्यात आली आहे. तसेच ज्या अधिकाऱ्याच्या प्रभाराखाली अशी वाहने सोपविलेली असतील अशा अधिकाऱ्यांनासुध्दा शासकीय वाहनांच्या गैरवापरासाठी या नियमाच्या भंगाबद्दल जबाबदार ठरविण्यात आले आहेत.

३. सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, दिनांक ०३.०३.२००९ चे शासन परिपत्रक आणि भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १५.०१.१९९६ च्या आदेशाचे अवलोकन करावे व राज्यामध्ये होणाऱ्या सर्व सार्वत्रिक/पोट निवडणूकीच्या वेळी त्यांचे तंतोतंत पालन करावे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

**( सु. य. पाटील )**
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Circular F.N.348*
*06/4/2009*

निवडणूक प्राथम्य

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२००९**
**निवडणूक कालावधीत शासकीय वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-सीईएल-२००९/प्र.क्र. १९७/२००९/३३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३ मार्च,२००९

परिपत्रक

भारत निवडणूक आयोगाने, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या तसेच त्याबाबत त्याला असलेल्या इतर शक्तींचा वापर करुन निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीच्या प्रचारार्थ, निवडणुकीच्या कार्यासाठी अथवा निवडणुकीशी संबंधित प्रवासाकरिता मंत्री, राज्यमंत्री, राजकीय पक्ष, उमेदवार वा निवडणुकीशी संबंधित अन्य कोणत्याही व्यक्तीने शासकीय वाहनांचा वापर करण्यावर पूर्णत: बंदी घातली आहे. निवडणूक जाहीर झाल्याच्या तारखेपासून ते निवडणूक पूर्ण होण्याच्या तारखेपर्यन्त मंत्री यांच्यासह अन्य कोणाही प्राधिका-यांच्या ताब्यात असलेल्या शासकीय वाहनांचा वापर निवडणूक प्रचारार्थ वा निवडणुकीशी संबंधित दौ-यावर करण्याकरिता जरी भरणा तत्वावर (on Payment Basis) करावयाचा झाला तरी, पूर्णत: बंदी घालण्यात आली आहे. याबाबत भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या त्यांच्या क्र.४३७/६/९६/पीएलएन-तीन/२४११, दिनांक १५ जानेवारी,१९९६ च्या आदेशाची प्रत माहितीसाठी सोबत जोडली आहे.

२. निवडणूक आयोगाचे वरील आदेश हे स्थायी आदेश समजण्यात यावेत व राज्यामध्ये होणा-या सर्व सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या वेळी त्यांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. मंत्रालयीन विभागांनी निवडणूक आयोगाच्या सूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपालिका, सहकारी संस्था अथवा ज्यामध्ये सार्वजनिक निधी गुंतविण्यात आला आहे अशा कोणत्याही संस्था यांच्या त्वरित निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांना आयोगाच्या आदेशांचे काटेकोरपणे अनुपालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

४. सर्व प्रकारच्या शासकीय वाहनांचा गैरवापर टाळण्याकरिता, अशी वाहने ताब्यात असलेल्या अधिका-यांना व्यक्तीशः जबाबदार धरले जाईल व निवडणूक आयोगाच्या आदेशांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, अशा अधिका-यांविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( जॉनी जोसेफ )
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा ), मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपालिका / नगर परिषदांचे मुख्य अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

* पत्राने.

----------

(४-२१११ बी] -१३.

## बाब क्रमांक ७९

क्रमांक ४३७/६/९६(पीएलएन-तीन)/२४११. दिनांक १५ जानेवारी १९९६.

### आदेश

विषय.—सार्वत्रिक निवडणुका/पोट-निवडणुका—निवडणुकीच्या काळात " शासकीय वाहनांच्या " गैरवापरास प्रतिबंध करणे.

निवडणूक प्रक्रियेमध्ये शुचिता रहावी म्हणून आणि लोकांची खरी निवड प्रतिबिंबित व्हादी यासाठी त्या दृष्टीने विविध बाबींच्या संबंधात आयोगाने सूचना व आदेश काढलेले आहेत. निवडणूक प्रक्रियेमधील वाढती गुन्हेगारी आणि झुंडशाही ह्या दोन बाबी आयोगासाठी चिंतेच्या बाबी ठरल्या आहेत आणि निवडणुका शांत वातावरणात आणि निर्भयपणे व निःपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी आयोग बऱ्याच उपाययोजना करीत आहे.

२. आयोगाने आता असे ठरविले आहे की, लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या सर्व सार्वत्रिक/पोट-निवडणुकांसाठी खालीलप्रमाणे स्थायी अनुदेश असतील. त्याचप्रमाणे हे अनुदेश संबंधित राज्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघामधील सर्व द्विवार्षिक/ पोट-निवडणुकांनाही तसेच लागू होतील. हे अनुदेश या विषयांशी संबंधित आधीच्या सर्व अनुदेशांचे अधिक्रमण करून लागू असतील.

३. हे अनुदेश निवडणुकांची तारीख घोषित झाल्यापासून निवडणुका पूर्ण होईपर्यंत अंमलात असतील.

४. या अनुदेशांच्या प्रयोजनार्थ " वाहन " याचा अर्थ वाहतुकीच्या प्रयोजनार्थ वापरले जाणारे किंवा वापरता येऊ शकणारे कोणतेही वाहन असा आहे, मग ते वाहन यंत्रशक्तीच्या सहाय्याने गतिमान होणारे असो वा अन्यथा गतिमान होणारे असो आणि त्यामध्ये ट्रक, लॉऱ्या, टेम्पो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसेस (१) केंद्र शासन, (२) राज्य शासन, (३) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, (४) केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त क्षेत्र उपक्रम, (५) स्थानिक संस्था, (६) महानगरपालिका, (७) नगरपालिका, (८) पणन मंडळे (कोणत्याही नावाने ज्ञात असलेली), (९) सहकारी संस्था, (१०) स्वायत्त जिल्हा परिषदा किंवा ज्या संस्थांमध्ये जनतेच्या पैशाची गुंतवणूक आहे, अशी अन्य कोणतीही संस्था मग गुंतवणूक एकूण ती गुंतवणुकीचा कितीही छोटा हिस्सा असो, यांच्या मालकीची आणि संरक्षण मंत्रालय आणि गृह मंत्रालय, राज्य शासने यांच्या अधिपत्याखालील मध्यवर्ती/केंद्रीय पोलीस संघटना यांच्या मालकीची अन्य कोणतीही वाहने यांचा समावेश आहे.

५. आयोग असा निदेश देत आहे की, निवडणुकांच्या काळात प्रचार मोहीम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनांच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात येईल. (एक) केंद्र शासन, (दोन) राज्य शासन (तीन) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, (चार) केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त क्षेत्र उपक्रम, (पाच) स्थानिक संस्था, (सहा) पणन मंडळे, (सात) सहकारी संस्था, (आठ) स्वायत्त जिल्हा परिषदा किंवा ज्या संस्थांमध्ये जनतेच्या पैशाची गुंतवणूक आहे अशी अन्य कोणतीही संस्था, मग कोणताही राजकीय पक्ष, उमेदवार किंवा निवडणुकीशी संबंधित कोणतीही अन्य व्यक्ती यांनी निवडणुकीशी संबंधित कोणत्याही प्रयोजनार्थ ती गुंतवणूक एकूण गुंतवणुकीच्या कितीही छोटा हिस्सा गुंतवलेला असो ...च्या मालकीच्या (या विषयासंबंधात आयोगाच्या आदेशानुसार विनियमित असतील त्या व्यतीरिक्त) हेलिकॉप्टर, विमाने, मोटारगाड्या, जीप, स्वयंचलित मोटारगाड्या, बोटी, हॉवरक्राफ्ट इत्यादींसारख्या कोणत्याही वाहनांच्या वापरावर संपूर्ण निर्बंध घालण्यात येतील.

६. या ठिकाणी हे स्पष्ट करण्यात येत आहे की, वाहनांच्या वापरावरील बंदी, ही निवडणुका नसणाऱ्या राज्यातील किंवा त्या राज्यामधून येणारी जी वाहने निवडणुका असणाऱ्या इतर कोणत्याही राज्यात उघडपणे किंवा चोरट्या मार्गाने निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी वापरण्याचा प्रयत्न केला जाईल, अशा वाहनांच्या बाबतीतही तशीच लागू होईल. प्रत्येक राज्याचा/संघराज्य क्षेत्राचा मुख्य सचिव हा, त्याच्या राज्यात होणारा कोणत्याही वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याबाबत व्यक्तिशः जबाबदार असेल आणि केंद्र शासनाच्या संबंधित विभागातील सचिव हा मंत्रालयाच्या/ विभागाच्या अखत्यारीतील कोणत्याही वाहनाच्या तसेच त्या मंत्रालयाच्या/ विभागाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही सार्वजनिक क्षेत्राच्या किंवा संयुक्त क्षेत्रीय उपक्रमाच्या किंवा स्वायत्त संस्थांच्या किंवा संलग्न कार्यालयांच्या मालकीच्या वाहनांच्या गैरवापराबाबत व्यक्तिशः जबाबदार असेल. ज्या अधिकाऱ्याच्या प्रभाराखाली अशी वाहने सोपवलेली असतील ते अधिकारीसुद्धा या नियमाच्या भंगाबद्दल तेवढेच जबाबदार असतील.

७. या प्राधिकरणापैकी कोणाच्याही मालकीच्या अशा वाहनाचा कोणीही, अगदी केंद्र व राज्य शासनाच्या मंत्र्यांनीसुद्धा निवडणूक प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित दौऱ्यांसाठी, मंत्री या नात्याने निवडणूकविषयक कामाच्या खोट्या सबबीखाली पैसे भरून वापर करण्यासही पूर्णपणे मनाई आहे. या मनाईतून फक्त पंतप्रधानांचा आणि ज्याच्या जीवाला अतिरेक्यांच्या व दहशतवाद्यांच्या कारवायांमुळे धोका आहे व ज्यांना कडेकोट सुरक्षा व्यवस्थेची गरज आहे आणि संसदेने किंवा राज्य विधान मंडळाने या संदर्भात केलेल्या सांविधिक तरतुदींमध्ये ज्यांच्या सुरक्षा व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे अशा इतर राजकीय व्यक्तींचा, अपवाद करण्यात आला आहे. वरील निर्बंध हे, भारताचे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती, लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती तसेच इतर राज्यांतून राज्याला भेटी देणाऱ्या अन्य मान्यवर व्यक्ती यांच्या बाबतीतही लागू होणार नाहीत. लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती यांच्या बाबतीत हे निर्बंध लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी लागू होतील तथापि, केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही मंत्र्यांच्या बाबतीत असा अपवाद केला जाणार नाही, हे येथे स्पष्ट करण्यात येत आहे.

७-(अ). आयोगाला एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की, विशेष संरक्षण गट अधिनियम, १९८८ किंवा शासनाची अन्य कोणतीही विशेष अधिनियमिती/सूचना याखालील प्राधिकरणाने ठरविलेली सुरक्षाविषयक आवश्यकता उघडउघडपणे किंवा अवाजवी रीत्या जादा आहे आणि विशिष्ट पक्षाचे किंवा उमेदवाराचे निवडणूकविषयक हितसंबंध अप्रत्यक्षपणे जपण्याचा त्यामागे हेतू आहे, अशी शंका घेण्यास आयोगास सबळ पुरावा असेल तर, आयोग, ती बाब त्वरित व उचित कार्यवाहीकरिता संबंधित शासनाच्या निदर्शनास आणून देईल.

७-(ब). या प्रयोजनार्थ, आयोग केंद्र शासनाकडून किंवा संबंधित राज्य शासनाकडून अशा कोणत्याही व्यक्तीच्या सुरक्षाविषयक आवश्यकतांबाबतची कोणतीही माहिती मागवील. अशी माहिती संबंधित शासन ताबडतोब आयोगाकडे सादर करील.

८. आयोग आणखी असाही निदेश देत आहे की, कोणत्याही परिस्थितीत, सुरक्षेसाठी असलेल्या मोटारगाड्या/वाहने यांच्या ताफ्यांत तीनपेक्षा अधिक वाहने नसावीत. सर्व मोठ्या ताफ्यांचे ते केंद्रीय किंवा राज्य शासनाच्या मंत्र्यांसोबत असले तरीही छोटे छोटे तुकडे करण्यात यावेत. तथापि, असे करताना, अशा एखाद्या व्यक्तीसंबंधात सुरक्षाविषयक काही सूचना दिल्या असल्यास त्या विचारात घेण्यात याव्यात.

९. आयोग आणखी असा निदेश देत आहे की, निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून ते निवडणुका पूर्ण होईपर्यंत, वर नमूद केलेल्या वाहनांचा, एखाद्या उमेदवाराकरिता किंवा उमेदवाराकडून निवडणूकविषयक कामासाठी गैरवापर होतो किंवा कसे यावर जिल्हा प्रशासनाने बारकाईने लक्ष ठेवावे. केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या वर नमूद केलेल्या एखाद्या वाहनाचा तसेच, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या किंवा स्थानिक संस्थांच्या वाहनाचा, निवडणूकविषयक कामासाठी गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास, जिल्हा दंडाधिकाऱ्याने ताबडतोब असे वाहन, योग्य ती कार्यवाही करून अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १६० याखालील निवडणूकविषयक आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्याचा वापर करता यावा म्हणून अधिग्रहित करावे किंवा तशी व्यवस्था करावी, अशा रीतीने अधिग्रहित केलेली वाहने, निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सोडण्यात येऊ नयेत.

१०. आयोगाचे वरील निदेश हे, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ द्वारे आयोगाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंबंधात त्यास समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून देण्यात आले आहेत.

११. हे निदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत. या आदेशाची इंग्रजी/हिंदी प्रत आणि कोणत्याही स्थानिक भाषेतील/भाषांतील प्रत, सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य पातळीवरील राजकीय पक्षांना आणि प्रत्येक उमेदवाराला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याला, त्या उमेदवाराच्या नामनिर्देशनाच्या वेळी (पुनर्नामनिर्देशनाच्या वेळी, परंतु नामनिर्देशनाच्या छाननीच्या वेळी नव्हे) पोच घेऊन उपलब्ध करून देण्यात यावी.

- - - -